**ग्रामीण कृषी मौसम सेवा**

भारत मौसम विभाग

प्रायोगिक ब्लॉक लेव्हल ॲग्रोमेट ॲडव्हायझरी बुलेटिन

(आयएमडी आणि आयसीएआर चा संयुक्त उपक्रम)

# हवामानावर आधारीत कृषि सल्ला

**दिनांक : 07-03-2025**

**नागपूर(महाराष्ट्र) मध्ये उमरेड ब्लॉक करा साठी हवामान पूर्वानुमान - वर जारी :2025-03-07 ( पुढील पाच दिवसांसाठी सकाळी ८:३० वाजेपर्यंत वैध)**

| हवामान घटक | 2025-03-08 | 2025-03-09 | 2025-03-10 | 2025-03-11 | 2025-03-12 |
|---|---|---|---|---|---|
| पर्जन्यमान (मिमी) | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| कमाल तापमान (अं.से) | 34.8 | 37.1 | 36.9 | 37.5 | 38.6 |
| किमान तापमान (अं.से) | 18 | 19.8 | 22 | 22.2 | 22.2 |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 31 | 30.2 | 31.1 | 42.5 | 40 |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 8 | 9 | 12.7 | 14.4 | 12.6 |
| वाऱ्याचा वेग(किमी/तास) | 5.4 | 7 | 9 | 7.4 | 4.3 |
| वाऱ्याची दिशा(अंश) | 19.6 | 21.2 | 73.7 | 112.8 | 131.7 |
| मेघाच्छादन (ऑक्टा) | 0 | 0 | 0 | 0 | 0 |

## हवामान सारांश / चेतावणी:

• भारतीय हवामान विभाग, प्रादेशिक हवामान केंद्र, नागपूर च्या मूल्यवर्धित अंदाजानुसार, तालुक्यामध्ये, पुढील ५ दिवस, दिनांक ०९ ते १२ मार्च २०२५ दरम्यान आकाश निरभ्र राहील, • दिनांक ०८, ०९, १०, ११ आणि १२ मार्च २०२५ रोजी हवामान कोरडे राहण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. • विदर्भामध्ये पुढील ४ दिवसात किमान तापमानात ३-५ अंश सेल्सिअस ने वाढ होईल तर पुढील ३ दिवसामध्ये कमाल तापमानात २ ते ४ अंश सेल्सिअस ने वाढ होईल त्यांनतर कमाल व किमान तापमानात फारसा बदल होणार नाही.

## कृषि सल्ला:

• परिपक्व अवस्थेतील हरभरा, गहू, जवस, तूर, मोहरी व इतर रब्बी हंगामातील पिकाची कापणी व मळणी प्राधान्याने उरकून घ्यावी. कापणी केलेला शेतमाल कोरड्या व सुरक्षित ठिकाणी साठवावा. • हंगामी पिके, फळपिके व भाजीपाला पिकामध्ये आवश्यकता असल्यास ठिबक सिंचन/तुषार सिंचन पद्धतीद्वारे हलके ओलीत करावे. • हंगामी पिके, फळबागा, भाजीपाला पिकामध्ये आंतरमशागतीची कामे (डवरणी, खुरपणी इत्यादी.), कीड व रोग व्यवस्थापनासाठी कृषी रसायनांची फवारणीची कामे व उभ्या पिकामध्ये खते देण्याची कामे पुढील ५ दिवस सुरु ठेवावीत.

**संक्षिप्त संदेश सल्ला:**

| |
|---|
| हंगामी पिके, फळपिके व भाजीपाला पिकामध्ये आवश्यकता असल्यास ठिबक सिंचन/तुषार सिंचन पद्धतीद्वारे हलके ओलीत करावे. |

**पिक निहाय सल्ला:**

| पिक | पिक निहाय सल्ला |
|---|---|
| तीळ | • तीळ पिकास जमिनीच्या मगदुराप्रमाणे १२ ते १५ दिवसाच्या अंतराने ओलीत करावे. ओलीत करताना पिक क्षेत्रामध्ये पाणी साचून राहणार नाही याची दक्षता घ्यावी. आवश्यकतेनुसार २ ते ३ वेळा खुरपणी/कोळपणी करून शेत स्वच्छ ठेवावे. पिकाची सुरुवातीची वाढ हळू होत असल्याने पिक एक महिन्याचे होई पर्यंत शेतात तन होणार नाही याची काळजी घ्यावी. |
| भुईमूग | • उन्हाळी भुईमुग पिकास दर ८ ते १० दिवसाच्या अंतराने दोन ओळी आड ओलीत करावे. |
| सूर्यफूल | • उन्हाळी सुर्यफुल पिकास पिकास दर ८ ते १० दिवसाच्या अंतराने दोन ओळी आड ओलीत करावे. |

**फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला:**

| फळे आणि भाजीपाला पिक | फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला |
|---|---|
| कांदा | • कांदा पिकाला लागवडीनंतर जमिनीतील ओलाव्यानुसार ७-१० दिवसांच्या अंतराने ओलीत करावे. • लागवडीनंतर ३० दिवसांनी ३५ किलो/हेक्टर या प्रमाणात नत्राचा पहिला हप्ता द्यावा. • लागवडीनंतर ४५ दिवसांनी ३५ किलो/हेक्टर या प्रमाणात नत्राचा दुसरा हप्ता द्यावा. • रोग आणि कीटकांचे नियंत्रण करण्यासाठी आवश्यक असल्यास कार्बोसल्फान (२ मिली/लीटर) आणि ट्रायसायक्लॅझोल (१ ग्रॅम/लीटर) ची पहिली फवारणी करावी. • आवश्यक असल्यास, पहिल्या फवारणीच्या १५ दिवसांनी प्रोफेनोफॉस (१ मिली/लीटर) आणि हेक्साकोनाझोल (१ ग्रॅम/लीटर) ची दुसरी फवारणी करावी. • आवश्यक असल्यास, दुसऱ्या फवारणीच्या १५ दिवसांनी फिप्रोनिल (१ मिली/लीटर) आणि प्रोपिकोनाझोल (१ ग्रॅम/लीटर) ची तिसरी फवारणी करावी. • लागवडीनंतर ४५, ६० आणि ७५ दिवसांनी सूक्ष्म पोषक मिश्रण (५ ग्रॅम/लीटर) पानांवर फवारणी करावी. |
| लसूण | • लसूण पिकास कमी पण नियमित पाणी आवश्यक आहे. उगवण झाल्यानंतर ८ ते १० दिवसाच्या अंतराने पिकाच्या गरजेनुसार जमिनीच्या मगदुराप्रमाणे पाण्याच्या पाळ्या द्याव्या. साधारणपणे १२ ते १५ पाण्याच्या पाळ्या लागतात. • लसूण लागवडीनंतर ३०, ४५ आणि ६० दिवसांनी सूक्ष्म अन्नद्रव्यांचे मिश्रण (५ ग्रॅम/लिटर) या प्रमाणात फवारणी करावी. • रोग आणि कीटकांचे नियंत्रण करण्यासाठी आवश्यक असल्यास कार्बोसल्फान (२ मिली/लिटर) आणि ट्रायसायक्लॅझोल (१ ग्रॅम/लिटर) ची पहिली प्रतिबंधात्मक फवारणी करावी. • आवश्यक असल्यास, पहिल्या फवारणीनंतर १५ दिवसांनी प्रोफेनोफॉस (१ मिली/लिटर) आणि हेक्साकोनाझोल (१ ग्रॅम/लिटर) ची दुसरी फवारणी करावी. • जर पहिल्या दोन फवारण्या संपल्या असतील, तर आवश्यक असल्यास, दुसऱ्या फवारणीनंतर १५ दिवसांनी फिप्रोनिल (१ मिली/लिटर) आणि प्रोपिकोनाझोल (१ ग्रॅम/लिटर) ची तिसरी फवारणी करावी. • लागवडीनंतर ३० दिवसांनी २५ किलो/हेक्टर या प्रमाणात नत्राचा पहिला हप्ता द्यावा. • लागवडीनंतर ४५ दिवसांनी २५ किलो/हेक्टर या प्रमाणात नत्राचा दुसरा हप्ता द्यावा. • |

| फळे आणि भाजीपाला पिक | फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला |
|---|---|
| | जर लाल कोळी किडीचा प्रादुर्भाव आढळला तर, एलिमेंटल सल्फर (२ ग्रॅम/लिटर) किंवा डायकोफोल (२ मिली/लिटर) या प्रमाणात फवारणी करावी. |
| आंबा | • आंब्याच्या झाडावर तुडतुडे किडीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास व आर्थिक नुकसान पातळी गाठत असल्यास व्यवस्थापनासाठी बुप्रोफेझीन २५ % SC १० मिली किंवा डेल्टामेथ्रीन २.८ % EC ५ मिली किंवा इमिडाक्लोप्रिड १७.८ % प्रवाही ४ मिली किंवा लँबडा सायहॅलोथ्रिन ५ % प्रवाही ५ मिली किंवा डायमेथोएट ३० % प्रवाही १६.५ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून हे द्रावण खोडावर, फांद्यावर, शेंड्यावर आणि मोहोरावर फवारावे. • आंब्याच्या झाडावर फुलोरा अवस्थेत भुरी रोगाची लक्षणे दिसून आल्यास व्यवस्थापनासाठी पाण्यात मिसळणारे गंधक ८० % डब्ल्यूपी 30 ग्राम किंवा टेट्राकोनाझोल ३.८ % प्रवाही १२.५ मिली किंवा हेक्झाकोनाझोल ५ % प्रवाही १० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| टरबूज | • बाजारायोग्य शेतमालाची काढणी करून विक्री करावी. • पेरणीनंतर १५, ३० आणि ४५ दिवसांनी निंदनी करून तन नियंत्रण करावे. • कलिंगड सिंचनाला चांगला प्रतिसाद देते म्हणून नियमित अंतराने ओलीत करावे. पिकास वारंवार जास्त पाणी देऊ नये त्यामुळे वनस्पतींची वाढ जास्त होते. फळे काढणीस आल्यानंतर पाणी देणे थांबवावे कारण त्यामुळे फळांच्या गुणवत्तेवर विपरीत परिणाम होतो आणि फळे फुटतात. पिकामध्ये पाणी साचू देऊ नका. फुलधारणेपूर्वी, फुले येण्याच्या आणि फळांच्या विकासाच्या अवस्थेमध्ये पाण्याचा ताण बसणार नाही दक्षता घ्यावी. फक्त मुळांच्या भागात पाणी द्यावे आणि ओलीत करताना वनस्पतींच्या विविध भागास, फुले आणि फळे ओली होणार नाही याची काळजी घ्यावी. • वनस्पतीजन्य वाढ रोखण्यासाठी आणि मादी-नर फुलांचे प्रमाण वाढविण्यासाठी जास्त वाढ झालेल्या वेलीची हाताने छाटणी करावी. जर शेंडा खुडला आणि बाजूच्या २-४ कोंबांना वाढू द्यावे असे केल्यास उत्पादन वाढीस मदत होते. फळांचा आकार आणि उत्पादन सुधारण्यासाठी प्रत्येक वेलात जास्तीत जास्त ४-५ फळे टिकवून ठेवण्यासाठी फळांची विरळणी करावी. |
| संत्रा | • मार्च महिन्यात तापमान वाढ झाल्यामुळे १-४, ५-७, ८ वर्षे आणि त्यावरील वयाच्या झाडांना दररोज अनुक्रमे १२-५३, ७८- १२७ आणि १४५-१८० लिटर पाणी ठिबक सिंचन पद्धतीद्वारे द्यावे. दुहेरी आळे पद्धत अवलंब करावा आणि बगीच्यास ७ ते १० दिवसाच्या अंतराने ओलीत करावे. झाडांच्या आळयांमध्ये आच्छादनाचा वापर करावा. • या महिन्यात झाडाच्या खोडावर फायटोप्थोराची लक्षणे आढळल्यास खोडाचा प्रभावित भाग चाकूच्या सहाय्याने खरडून घ्यावा. पृष्ठभाग पोटॅशियम परमँगनेट द्रावणाने धुवा आणि त्यावर मेफेनोक्साम एमझेड-६८ ची पेस्ट लावावी. संपूर्ण झाडावर मेफेनोक्साम एमझेड- ६८ @ २.५० ग्रॅम/लिटर किंवा फॉसेटाइल एएल @ २.५ ग्रॅम/लिटर पाणी या प्रमाणात बुरशीनाशकाची फवारणी करा. • ब्रशच्या सहाय्याने झाडाच्या खोडावर ६० सेमी उंचीपर्यंत बोर्डो पेस्ट लावावी. • सिट्रस सिला आणि पाने गुंडाळणाऱ्या अळी या किडीचा प्रादुर्भाव झाल्यास, डायमेथोएट १.५ मिली किंवा इमिडाक्लोप्रिड ०.५ मिली किंवा क्विनालफॉस २ मिली किंवा थायमेथोक्साम ०.३ ग्रॅम प्रती एक लिटर पाणी या प्रमाणात मिसळून फवारणी करावी. १५ दिवसांच्या अंतराने पुन्हा फवारणी करा. • फळातील रस शोषणाऱ्या पतंग या किडीचा प्रादुर्भाव झाल्यास, क्विनालफॉस २ मिली किंवा फेनव्हॅलेरेट १ मिली प्रती एक लिटर या प्रमाणात मिसळून पाण्यात फवारणी करावी. १५ दिवसांनी पुन्हा फवारणी करावी. • आंबिया बहरातील फळगळ रोखण्यासाठी २, ४- डी, १.५ ग्रॅम आणि १ किलो युरिया १०० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. • तापमानात ३५ |

| फळे आणि भाजीपाला पिक | फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला |
|---|---|
| | ते ४० अंश सेल्सिअस वाढ झाल्यास २, ४-डी १.५ ग्रॅम आणि पोटॅशियम नायट्रेट १ किलो १०० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |

**पशुधन विषयक निहाय सल्ला:**

| पशुधन विषयक | पशुधन विषयक निहाय सल्ला |
|---|---|
| गाय | • उन्हाळी चारा उपलब्धतेसाठी ज्वारी, मका व बाजरी या पिकाची लागवड करावी. यासाठी ज्वारीच्या रुचिरा, एसएसजी- ५९-३, मालदांडी ३५-१, पुसा चारी व अमृता, मक्याच्या आफ्रिकन टोल, मांजरी कंपोजीट, विजय व गंगा सफेद-२ व बाजरीच्या जायंट बाजार, के ६७४, ६७७ राजको, बाजरा, न्यूट्रीफीड या वाणाची लागवड करावी. ज्वारी, मका व बाजरी या पिकाची चारा उपलब्धतेसाठी मार्च-एप्रिल महिन्यात लागवड करावी. ज्वारी, मका व बाजरी ची पेरणी पाभरीच्या सहाय्याने दोन ओळीतील अंतर ३० सेंमी एवढे ठेऊन करावी. • दुग्धउत्पादन वाढविण्यासाठी दुधाळ गाय/म्हशी यांना हवे त्या वेळी पिण्यासाठी २४ तास स्वच्छ पाण्याची उपलब्धता त्याच्यासमोर करावी. पाण्याचा हौद नेहमी स्वच्छ ठेवावा, त्यास चुना लावावा. पाण्याचे हौद नेहमी सावलीत, पाण्यात पक्षांची विष्ठा पडणार नाही अशा ठिकाणी हौद ठेवावे. |

**इतर (माती / जमीन तयार करणे) निहाय सल्ला:**

| इतर (माती / जमीन तयार करणे) | इतर (माती / जमीन तयार करणे) निहाय सल्ला |
|---|---|
| सामान्य सल्ला | • शिफारशीनुसार फेब्रुवारी महिन्यात चवळी, गवार, कोथिंबीर, कारले, काकडी, ढेमसे, दुधी भोपळा, कोहळे, चोपडा दोडका, शिरी दोडका, टरबूज, खरबूज इत्यादी पिकाची लागवड राहिल्यास त्वरित करून घ्यावी. • ठिबक किंवा तुषार पद्धतीने ओलीत व्यवस्थापन करावे. |